पूर्वा
कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
**डॉ. बी.बी. पवार**

संपादक
**डॉ. भास्कर गायकवाड**

संपादन सहयोग
**पराग वाड**

चित्रांकन आणि मांडणी
**कैलास भामरे**

मुखपृष्ठ
**विजय सैंदाणे**

व्यवस्थापक - लेखा विभाग
**राजेंद्र बागुल**

सहकार्य
**विजय पवार**
संचालक, पूर्वा अॅग्रोटेक

**सुहास कदम**
संचालक, पूर्वा अॅग्रो मार्केटिंग

**महेश पाटील**
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

**विजय नाईकरे**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

**सचिन दिघे**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

**रईस इनामदार**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

**नंदकिशोर चतरकर**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

**संजय पाटील**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

**पूर्वा केमटेक प्रा.लि.,**
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

## संपादकीय

# युवा पिढी आणि कृषी विकासाची भावी दिशा



**डॉ. भास्कर गायकवाड**
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- **शेतीकडे नाईलाज म्हणून नव्हे; तर सक्षम पर्याय म्हणून बघावे**
- **ग्राहकाची बदलती मानसिकता ओळखून कृषी उत्पादने घेतली पाहिजेत**
- **पारंपरिक कृषितंत्रापेक्षा प्रगत साधनांचा वापर आवश्यक ठरेल**
- **दूध, दुग्धजन्य पदार्थ, मांसाहाराची वाढती मागणीही लक्षात घ्यावी**
- **अनेक कृषिपूरक व्यवसायांचा विचार देखील प्रगतीची दिशा दाखवेल**
- **संख्यात्मक आणि गुणात्मक युवाशक्ती हीच ग्रामोन्नतीची शाश्वती**

बेरोजगारांना रोजगार देणारा, कमीतकमी भांडवली गुंतवणुकीमध्ये जास्तीत जास्त रोजगार निर्माण करणारा आणि ग्रामीण भागाला आधार देणारा खरा व्यवसाय म्हणजे शेती. शेती एक सांस्कृतिक परंपरा आहे व तिच्याकडे त्याच दृष्टिकोनातून बघितले पाहिजे. शेती म्हणजे काही कारखाना नाही; परंतु शेती क्षेत्राबाबत शेतकरी स्वत:च प्रतिकूल गोष्टींचा प्रसार आणि प्रचार करतो. आपल्या मुलाच्या मनावर शेतकरी स्वत:च सतत बिंबवतो की, चांगले शिक्षण घे आणि शिक्षण घेऊन कोणतीही नोकरी कर. याचा दुष्परिणाम आज शेती क्षेत्राकडे बघण्यावर झालेला आहे. शिक्षण पूर्ण झाले, कोणतीही नोकरी मिळाली नाही म्हणून युवक शेती करतो. म्हणजेच कोणतेही काम जमत नाही म्हणून तू शेती कर; ही प्रवृत्तीच खरे पाहता शेतीच्या प्रगतीला आडवी आली! शिक्षण घेऊन शेतीकडे वळलेल्या तरुणाची मानसिकताही अशीच असते. आपल्या शेतातील प्रत्येक काम तो आवडीने करण्याऐवजी नाईलाज म्हणून करतो. समाजही सारखा त्याला टोचणी देत असतो. एवढे शिक्षण घेऊन शेवटी शेतीच करावी लागली ही भावना सर्वांच्या मनात तयार होते. बोहल्यावर चढण्यामध्येही अनंत अडचणी येतात. शेतीमध्ये बंगला असला तरीही मुलीचे वडील मुलगी द्यायला तयार होत नाहीत. या सर्व सामाजिक वातावरण निर्मितीला जबाबदार कोण? शेती एवढ्या कनिष्ठ दर्जाची ठरवली जाणार असेल तर मग सर्वांचे पोट कोण भरणार? शेतीमध्ये फायदा नाही, मग आजपर्यंत ग्रामीण अर्थव्यवस्था कशावर उभी आहे?

या साऱ्याचा आता विचार करण्याची वेळ आलेली आहे. शहरी भागातील समाजानेही शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे कारण शेतीमुळेच अन्नधान्याचा पुरवठा होतो. शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी हिरवी झाडे, वनस्पती, पिके यांची आवश्यकता असते; ते त्यांची वाढ करतात. अन्नधान्याबरोबरच शुध्द हवा देण्याचे काम शेतकरी करतो. म्हणूनच शेती किंवा शेतकऱ्यांसाठी शासनाने मोठ्या प्रमाणात मदत केल्यास नाक मुरडण्याची गरज नाही.

शेती क्षेत्र अत्यंत उत्तम, सुजलाम्- सुफलाम् आहे असे म्हणता येणार नाही. शेती क्षेत्रात आजही अनेक प्रश्न आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विचार करून ते सोडविण्यासाठीचे प्रयत्न फारच कमी आहेत. महागाई भत्त्याचा विचार सर्वांसाठी करत असताना शेतकऱ्याच्या उत्पादनाची किंमत मात्र महागाई भत्त्याच्या प्रमाणात वाढत नाही. प्रत्येक दहा वर्षांनी पगाराचा फेरआढावा घेऊन नवीन वेतनश्रेणी लागू होते. परंतु ती व्यवस्था शेती आणि शेतकऱ्यांसाठी नाही. शेतीमध्ये कष्ट आहेत, खर्च आहे; मात्र उत्पादन निसर्गाच्या हातात आणि बाजारभाव ग्राहक आणि व्यापाऱ्यांच्या हातात. 'मामा' (मान्सून आणि मार्केट) शेतकऱ्याला कधी धोका देईल हे सांगता येत नाही. त्यासाठी योग्य ते संरक्षणही नाही. परंतु हे सर्व असूनही आजही शेती क्षेत्रामध्ये चांगल्या गोष्टी बघायला मिळतात. नवनवीन प्रयोग सुरु असतात आणि शेतीला दिशा देण्याचे काम होत असते. शेती हे खरे नवनिर्मितीचे लक्षण आहे. हे काम करतात तरुण, शिक्षण घेतलेले ग्रामीण युवक की ज्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन मुळातच पॉझिटिव्ह आहे. असे काही युवक नवनिर्मितीचा आनंद घेतात, फक्त पैशांचा विचार करीत नाहीत.

## कृषी उत्पादनांविषयी समाजाची जागरूकता वाढली

शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. पूर्वीसारखा फक्त भाजी- भाकरी व डाळ-भात खाणारा समाज आज राहिलेला नाही. त्याला त्याच्या आहारामध्ये विविधता पाहिजे आहे. ग्राहक हा जागृत झालेला आहे. समाजाला स्वत:च्या आरोग्याबाबत काळजी वाटू लागली आहे. आहारातून आरोग्य चांगले राहते याबाबत समाजाची पूर्ण खात्री झालेली आहे. आहारामध्ये विभिन्नता आणि वैविध्य आवश्यक आहे. त्यासाठी वर्षभर आहारामध्ये विविधता आणण्यासाठी त्याचे प्रयत्न असतात. मग त्यासाठी कोणतीही किंमत मोजण्याची त्याची तयारी असते. फळे-भाजीपाला, कडधान्ये, मांसाहार, (मांस, मटण, मासे, अंडी) यासारख्या बाबींची मागणी गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ यांच्या बरोबरीने वाढत आहे. मागणी वाढत असताना फक्त त्या वस्तूच्या वजनाचा विचार न करता तिच्या गुणांचाही विचार सुरु झालेला आहे. ग्राहकांमध्ये चवीने (जिभेने) खाण्याबरोबरच नजरेने आणि मनाने खाण्याचे प्रमाणही वाढत आहे, याचा विचार करण्याची गरज आहे. ग्राहकांच्या या बदलत्या सवयीचा अभ्यास करून त्यानुसार फायदा घेण्याची गरज आहे. लोकसंख्येमध्ये वाढ होत असताना शेतीसाठी उपलब्ध असलेली जमीन, पाणी यांचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे भविष्यात अन्नधान्य सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणार आहे. अन्नधान्य सुरक्षेबरोबरच इंधन सुरक्षा (बायोडिझेल, इथेनॉल निर्मिती) यासाठी शेती क्षेत्राकडे मोठ्या अपेक्षेने बघितले जाते. जागतिक पातळीवर होणारे बदल हे शेती क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढणे व जास्त फायदा होणे यासाठी पोषक वाटतात. कमी पाण्यात, कमी जागेत चांगल्या दर्जाचे जास्त उत्पादन काढण्याची क्षमता ज्याच्याकडे असेल त्याच्याजवळ लक्ष्मी नांदणार, ही आज काळ्या दगडावरची रेष आहे. सर्वात महत्त्वाचा विचार म्हणजे कृषी क्षेत्राकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघितले तर शेती क्षेत्र हाच नजीकच्या काळात सर्वात शाश्वत व्यवसाय होणार आहे.

## शेती व्यवसायातून लक्षणीय रोजगार निर्मिती

कृषी क्षेत्राद्वारे आजही मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. एकूण रोजगारापैकी ५९ टक्के रोजगार निर्मिती कृषी क्षेत्रातून होत आहे. फक्त ग्रामीण भागाचाच विचार केला तर ७३ टक्के रोजगार कृषी व कृषिसंलग्न व्यवसायांतून निर्माण होत आहे. पीक उत्पादन, फलोत्पादन व दुग्धव्यवसाय हे शेती व्यवसायाचे मुख्य तीन आधारस्तंभ. या मुख्य व्यवसायांबरोबरच शेतीवर आधारित असंख्य व्यवसाय आहेत. शेती ही एकात्मिक पध्दती आहे. एक पीक किंवा एका व्यवसायावर आधारित शेती कधीही फायद्याची होत नाही. अशा व्यवसायामध्ये समाज अशाश्वत असतो; कारण नैसर्गिक आपत्ती, बाजारपेठ याबरोबरच इतरही अनेक कारणांमुळे ते पीक किंवा व्यवसाय तोट्यात गेल्यास शेतकरी खचून जातो! मात्र दुसऱ्या बाजूने विचार करता, वर्षभर हाताला काम, मनाला चालना द्यायला मिळाल्यामुळे त्यामध्ये सातत्य राहते. म्हणून एकात्मिक शेती पध्दतीला महत्त्व आहे. यामध्ये कृषी क्षेत्रावर आधारित उद्योग आणि व्यवसाय यांचा विचार आज युवा पिढीने करण्याची

गरज आहे. पीक उत्पादनामध्ये केवळ पारंपरिक पध्दतीने पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन आणि आंतरमशागती यांचा अवलंब न करता सूक्ष्म सिंचन पध्दत, फर्टिगेशन, यांत्रिकीकरण यांचा वापर केला तर ज्या शारीरिक कष्टाला आणि त्रासाला तरुण मंडळी घाबरतात त्यापासून त्यांची सुटका होईल. या कामातून शिल्लक राहिलेल्या वेळेत त्यांच्या शेतीला पूरक होईल असा व्यवसाय केलाच पाहिजे.

फलोत्पादन व्यवसायाला मोठी मागणी आहे. त्यामध्ये अधिक फायदा आहे आणि ज्ञानाबरोबरच काम करण्यासाठीही मोठा वाव आहे. चांगल्या प्रतीचे फलोत्पादन घेणारा शेतकरी लाखांची भाषा सहज बोलू शकतो! फलोत्पादन क्षेत्रामध्ये लागवडीपासून ते विक्री व्यवस्थेपर्यंत मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला वाव आहे. मग बागेची छाटणी असो की फवारणी, काढणी असो की पॅकिंग, सेवा-सुविधा पुरवठा यांसारख्या माध्यमांतून अनेकांना रोजगार देण्याचे काम फलोत्पादनाद्वारे होत आहे. अर्थात यामध्ये भविष्यात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. कारण आर्थिक प्रगतीबरोबरच खाण्याच्या बदलत्या सवयींमुळे फलोत्पादनाला मोठी मागणी वाढत आहे. फलोत्पादनामध्ये काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि त्यावर प्रक्रिया यासारखे उद्योग भविष्यात जास्त वाढणार आहेत. यातून रोजगार निर्मिती वाढेलच परंतु उत्पादकांनाही दोन पैसे मिळण्यास मदत होईल. पारंपरिक फलोत्पादनाबरोबरच आधुनिक पद्धतीच्या- नवीन फलोत्पादनाला मागणी वाढत आहे. हंगामातील उत्पादनाबरोबर बिगरहंगामी उत्पादनाला मागणी वाढत आहे. त्याचा विचार करून पॉलिहॉऊस, शेडनेट हाऊस यामधील उत्पादनापासून जास्त फायदा मिळविता येतो असे अनेक शेतकऱ्यांनी सिध्द केले आहे.

## पशुपालनातूनही ग्रामीण अर्थकारणाला गती मिळेल

दूध, दुग्धजन्य पदार्थांबरोबरच मांसाहाराचीही मागणी वाढत आहे. दुग्ध व्यवसायामध्ये दुधाची चांगली प्रत असेल तर त्यापासून जास्तीचा आर्थिक फायदा होतो. तसेच दुग्धजन्य पदार्थांपासूनही चांगला आर्थिक लाभ मिळविता येतो. दुग्ध व्यवसायामुळे आज अनेक शेतकरी कुटुंबांबरोबरच अनेक भूमिहीन मजुरांची कुटुंबेही आपला उदरनिर्वाह करू शकतात. भविष्यात वाढणाऱ्या मागणीमुळे दुग्ध व्यवसायात वाढ करण्याला मोठ्या प्रमाणात वाव आहे. दुग्ध व्यवसायाबरोबर कुक्कुटपालन, शेळी/ मेंढी पालन, वराहपालन यासारखे व्यवसाय शेतीपूरक आहेत. या व्यवसायांना सध्या चांगली मागणी असून भविष्यातही मोठी मागणी राहणार आहे. कुक्कुटपालनामध्ये करार पध्दतीने ब्रॉयलर फार्म ही संकल्पना मोठ्या प्रमाणात पुढे आलेली आहे. ब्रॉयलर कोंबड्यांबरोबरच स्थानिक गावरान कोंबडीला मागणी वाढत आहे. यामध्ये जास्त अंडी तसेच मटणाचे उत्पादन देणाऱ्या नवनवीन कोंबड्यांच्या जातींचा वापर करून गावरान कोंबडी फार्म सुरु केले तर हाही एक चांगला उद्योग ग्रामीण भागामध्ये सुरु करता येतो. स्थानिक कोंबड्यांची इन्क्युबेटर मशिनद्वारे पिल्ले तयार करून त्यांचा पुरवठा करणे हाही एक चांगला व्यवसाय आहे. गावरान कोंबडीच्या मटणाला मोठ्या प्रमाणात मागणी असते व त्याला दरही जास्त मिळतो. कुक्कुटपालनाप्रमाणे शेळी/ मेंढीच्या मटणाला मागणी वाढत आहे. अनेकदा मागणीनुसार पुरवठा न झाल्यामुळे त्यांच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असते. मांसाहार वाढत असताना हा व्यवसाय चांगला आर्थिक फायदा करून देण्यास सक्षम आहे. तसेच या व्यवसायाद्वारे मिळणारे उप-पदार्थ म्हणजेच शेणखत, लेंडीखत, कोंबडीखत हे शेतीच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे असल्यामुळे त्यांची मागणीही चांगली असते. शेणखताद्वारे गांडूळखत निर्मिती करून नवीन व्यवसाय सुरु करता येतो. तसेच गोबर गॅस यंत्राद्वारे गॅस निर्मिती करून स्वत:च्या वापरासाठी गॅस तसेच वीज तयार करता येईल. गोमूत्र, व्हर्मीवॉश यांसारख्या नैसर्गिक पीक संजीवकांची निर्मिती करून त्यांचाही वापर शेती उत्पादन वाढविण्यासाठी करता येतो. व्यापारी तत्त्वावर हा एक चांगला व्यवसाय होऊ शकतो.

पीक उत्पादन, फलोत्पादन आणि पशुपालन- दुग्ध व्यवसाय हे शेतीच्या एकात्मिक पध्दतीतील तीन मुख्य आधारस्तंभ असले तरीही इतर अनेक कृषिपूरक व्यवसाय करण्यासारखे आहेत. त्याद्वारे ग्रामीण भागामध्ये स्वयंरोजगार निर्मिती होते. रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन, गांडूळखत निर्मिती, मत्स्यपालन, जैविक खतनिर्मिती, जैविक कीटकनाशके निर्मिती, वनस्पतीजन्य कीटकनाशके निर्मिती, फळे-भाजीपाला प्रक्रिया, शेती व्यवसायाच्या उपयुक्त सेवा-सुविधा पुरवठा, रोपवाटिका, बीजोत्पादन, गोडावून, कोल्ड स्टोअरेज, ट्रान्सपोर्ट यांसारखे अनेक व्यवसाय ग्रामीण भागामध्ये करता येतात. अर्थात यासाठी मूलभूत सेवा आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता असणे गरजेचे आहे. मायक्रो फायनान्स, मायक्रो इन्शुरन्स, कृषी विमा, पशु-पक्षी विमा, प्रकल्प आराखडा तयार करणे, विविध यंत्रणांकडून व्यवसायासाठी आवश्यक बाबींची उपलब्धता करणे तसेच योग्य वेळी योग्य सल्ला- सेवा देणे या बाबी कृषिपूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी

महत्त्वाच्या आहेत. या सेवा-सुविधा देण्यासाठी उच्चशिक्षित ग्रामीण युवकांची गरज आहे. त्यातूनच त्यांना रोजगार मिळू शकतो. तसेच एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब करून  येणाऱ्या संकटांचा सक्षमपणे सामना करता येऊ शकतो.

## युवकांनी व्यावसायिक प्रशिक्षणावर भर द्यावा

युवा पिढीने आपला सर्वात पहिला कृती कार्यक्रम राबवावा तो म्हणजे कृषी व कृषिपूरक व्यवसायांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा. निसर्गाबरोबर राहून, अन्नदात्याचे काम करून मिळणाऱ्या साहजिक आर्थिक लाभापेक्षा मानसिक समाधान किती मिळते याचा विचार केला; तर या व्यवसायामध्ये खरोखरच मोठा आनंद आहे. दुसरा कृती कार्यक्रम म्हणजे कृषी आणि कृषिपूरक व्यवसाय हा फक्त अडाणी माणसांनी करण्याचा व्यवसाय नाही.  कारण यामध्ये आपला संबंध वनस्पती, झाडे, पशु-पक्षी निसर्गातील अनेक सजीवांशी असतो. सजीवांच्या स्वभावानुसार काम करत असताना निसर्गाचा लहरीपणाही सहन करावा लागतो. म्हणजेच हा व्यवसाय करण्यासाठी मोठ्या प्रमाणात ज्ञान, श्रध्दा आणि सबुरीची गरज आहे. इतर व्यवसाय पुस्तकी ज्ञानापासून सुरु करता येऊ शकतात परंतु कृषी व कृषिपूरक व्यवसाय सुरु करण्यासाठी पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिके आणि कार्यानुभवातून मिळणाऱ्या ज्ञानाला जास्त महत्त्व आहे. विज्ञानातून मिळालेल्या ज्ञानाबरोबरच अनुभवाचीही शिदोरी सोबत घ्यावी लागते. त्यासाठी जेथे प्रात्यक्षिकांद्वारे आणि कार्यानुभवातून प्रशिक्षण दिले जाते तेथे वेळ काढून प्रशिक्षण घ्यावे.  आपल्या मनाचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय व्यवसाय सुरु करू नये. अर्धवट ज्ञान आणि आत्मविश्वासाचा अभाव यामुळे व्यवसायामध्ये अपयश येण्याचे प्रमाण वाढते; मात्र अपयशाचे खापर व्यवसायावर फोडले जाते! ग्रामीण भागामध्ये संघटितपणा वाढविण्याची गरज आहे. कृषी व कृषिपूरक व्यवसाय करताना एकत्रित येऊन समूहाच्या माध्यमातून व्यवसाय केला तर उत्पादनापासून ते विक्रीपर्यंतचे व्यवस्थापन करणे सोपे होते. एकत्रित येऊन व्यवसाय केल्यास यश- अपयशाची एकत्रित चर्चा करून पुढील दिशा मिळण्यास मदत होते. आपल्या गावातील किंवा तालुक्यातील शेतकरी आपला प्रतिस्पर्धी होऊच शकत नाही; आपण खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करत आहोत याची जाणीव निर्माण झाली पाहिजे. असे झाल्यास गावातील किंवा परिसरातील युवकांना एकत्रित आणून कृषी व्यवसायाला प्रवृत्त करणे सोपे होईल.

## सकारात्मक दृष्टिकोन बाळगणे गरजेचे

कृषी व कृषिपूरक व्यवसायाला सर्वात मोठी साथ हवी ती ज्ञान पुरविणाऱ्या संस्थांची, आर्थिक पाठबळ देणाऱ्या वित्तसंस्थांची तसेच विकासात्मक काम करणाऱ्या यंत्रणांची. त्यांच्या आधाराशिवाय युवा पिढीला कृषी व्यवसायामध्ये यशस्वी होणे अवघड आहे. आज आपला कृषिप्रधान भारत देश एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे.  बुद्धिवंतांचा देश, कृषिप्रधान देश, ग्रामीण पार्श्वभूमी असलेला देश आज जगातील महाशक्तिशाली देशांच्या मांडीला मांडी लावून बसलेला आहे. आज जगातील १६ टक्के लोकसंख्या असलेल्या आपल्या देशामध्ये सर्वात जास्त तरुण- युवा पिढी  आहे. म्हणूनच या जास्त लोकसंख्येचा बाऊ न करता किंवा त्याच्याबद्दल चिंता करत बसण्यापेक्षा या तरुण व सळसळणाऱ्या लोकसंख्येच्या हातांचा व बुध्दीचा वापर करून महाशक्तिशाली देश, महासत्ता होण्याची हीच खरी वेळ आहे. आज देशाच्या प्रगतीचे सर्वच दरवाजे उघडलेले आहेत. त्यासाठी शासनाचे प्रयत्न आणि सक्रिय इच्छाशक्तीबरोबरच समाजाची इच्छाशक्ती जागृत होण्याची गरज आहे. देशाने मला काय दिले यावरच जास्त चर्चा करण्यापेक्षा मी देशाला तसेच समाजाला काय दिले किंवा काय देऊ शकतो याचाही विचार समाजाने; विशेषत: तरुण पिढीने करण्याची गरज आहे. जागतिक स्तरावरून कृषी व्यवसायाबद्दल एक चांगले विचारमंथन सुरु झालेले आहे. शेती व्यवसायाची वृध्दी झाली किंवा कमीतकमी तो व्यवसाय व्यवस्थित सुरु राहिला तरच देशाची प्रगती होईल याची जाणीव सर्वांना आहे. युवा पिढीने कृषी व कृषिपूरक व्यवसायांकडे चांगल्या भावनेने बघून, सकारात्मक दृष्टिकोनातून विचार केला तर निश्चितच कृषी व्यवसायाला भावी काळ उत्तम आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय भास्कर पवार यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : डॉ. भास्कर गायकवाड.

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.